वाचले :- १) शासन समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन निर्णय क्रं. जिदनिस-१०९५/प्र.क्रं.१२३/नादक-२ दिनांक ७/१२/१९९५.
२) इकडील आदेश क्रं. पसह/कावि/१८९५/२०१० दिनांक १/१०/२०१०
३) इकडील सुधारीत आदेश क्रं. पसह/कावि/२३६१/२०११ दिनांक २०/१२/२०११.
४) इकडील सुधारीत आदेश क्रं. पसह/कावि/२४०४/२०११ दिनांक ३१/१२/२०११.
५) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३२५ दिनांक- १७/०८/२०१५.

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
सर्वसाधारण शाखा,
क्रं.सशा/पसह/कावि/१८०९/२०१५
पुणे १ दिनांक - १८/०९/२०१५

**विषय :- जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती**

**आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयान्वये व आदेशान्वये जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. पालकमंत्री महोदयांकडून त्यांचेकडील दिनांक १७/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये प्राप्त शिफारशींचे अनुषंगाने अशासकिय सदस्यांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| अ.क्र | समितीची रचना व नांवे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | अध्यक्ष |
| २) | **जिल्ह्यातील लोकसभा सदस्य** | | |
| | अ) मा.श्री.बारणे श्रीरंग चंदू<br>खासदार, ३३ मावळ लोकसभा मतदार संघ | श्रीनिवास पद्मजी पेपर मिल जवळ थेरगाव, पुणे ४११ ०३३. | सदस्य |
| | ब) मा.श्री. अनिल शिरोळे,<br>खासदार, ३४ पुणेशहर लोकसभा मतदार संघ | गुलाब-शशीकला बंगला घोले रोड शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. | सदस्य |
| | क) मा.श्रीमती सुप्रियाताई सुळे,<br>खासदार, ३५ बारामती लोकसभा मतदार संघ | इ-१५ निसर्ग, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७. | सदस्य |
| | ड) मा. श्री. शिवाजीराव आढळराव पाटील,<br>खासदार ३६ शिरुर लोकसभा मतदार संघ | १०० बी, कल्पना अपार्टमेंट प्रभात रोड, लेन क्रं.९ एरंडवणा, पुणे- ४११ ००४. | |
| ३) | **जिल्ह्यातील राज्यसभा सदस्य** | | |
| | १)श्री. शरद पवार, राज्यसभा सदस्य | आमराई, बारामती, ता. बारामती, जि. पुणे | सदस्य |
| | २) श्रीमती अनु आगा, राज्यसभा सदस्य | थरमॅक्स हाऊस, वाकडेवाडी, पुणे- मुंबई रोड, पुणे ४११ ००५ | सदस्य |
| | ३) श्रीमती वंदना चव्हाण, राज्यसभा सदस्य | यशोधन, २१२१५१, रामबाग कॉलनी, पुणे-३० | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४) श्री. संजय काकडे, राज्यसभा सदस्य | लिलावती निवास, प्लॉट नं ९यशवंत घाटगेनगर, युनिर्व्हसिटी रोड, भोसलेनगर, पुणे ४११ ००७. | सदस्य |
| | ५) श्री. अमर साबळे, राज्यसभा सदस्य | कोहिनूर योजना अपार्टमेंट, A-२०५, पिंपरी, पुणे | सदस्य |
| ४) | **जिल्हयातील विधानसभा सदस्य** | | |
| | १) श्री.शरद सोनावणे, विधानसभा सदस्य, १९५, जुन्नर, विधानसभा मतदार संघ | ता.जुन्नर, जि.पुणे | सदस्य |
| | २) श्री.दिलीप वळसे पाटील, विधानसभा सदस्य १९६, आंबेगांव, विधानसभा मतदार संघ | रिव्हरव्हयु बिल्डींग, नंबर २, प्लॉट नंबर १३/१४, येरवडा नगर रोड, पुणे | सदस्य |
| | ३) श्री.सुरेश गोरे, विधानसभा सदस्य १९७, खेड-आळंदी, विधानसभा मतदार संघ | मु.पो.राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | सदस्य |
| | ४) श्री.बाबुराव काशिनाथ पाचार्णे, विधानसभा सदस्य १९८, शिरुर, विधानसभा मतदार संघ | मु.पो.ताडोबाची वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | सदस्य |
| | ५) श्री.राहूल कुल, विधानसभा सदस्य १९९, दौंड, विधानसभा मतदार संघ | मु.पो.खुटबाव, ता.दौंड, जि.पुणे | सदस्य |
| | ६) श्री.दत्तात्रय भरणे, विधानसभा सदस्य २००, इंदापूर विधानसभा मतदार संघ | मु.पो.बावडा,ता.इंदापूर, जि.पुणे | सदस्य |
| | ७) श्री. अजित पवार, विधानसभा सदस्य, २०१, बारामती विधानसभा मतदार संघ | बारामती हॉस्टेल, गोखलेनगर, पुणे | सदस्य |
| | ८) श्री.विजय शिवतरे, विधानसभा सदस्य २०२, पुरंदर, विधानसभा मतदार संघ | मु.यादववाडी, पो.हरगुडे, ता.पुरंदर जि.पुणे | सदस्य |
| | ९) श्री.संग्राम थोपटे, विधानसभा सदस्य २०३, वेल्हा-भोर-मुळशी,विधानसभा मतदार संघ | शिवप्रेरणा,पंढरपूर-महाड रोड, ता.भोर, जि.पुणे | सदस्य |
| | १०) श्री.संजय भेगडे, विधानसभा सदस्य २०४, मावळ, विधानसभा मतदार संघ | रामकृष्ण निवास, २७९/५, शनिवार पेठ, भेगडे आळी, ता.मावळ, जि.पुणे | सदस्य |
| | ११) श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, २०५, चिंचवड विधानसभा मतदार संघ | शिवाजी चौक, जगताप पाटील कॉम्प्लेक्स, पिंपळेगुरव, ता.हवेली, जि.पुणे | सदस्य |
| | १२) श्री.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य २०६,पिंपरी, विधानसभा मतदारसंघ | नालंदा कॉम्प्युटर सेंटर, १ ला मजला, डीलक्स सिनेमा चौक, पिंपरी, पुणे | सदस्य |
| | १३) श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य २०७, विधानसभा मतदार संघ | भोसरी, ता. हवेली, जि. पुणे | सदस्य |
| | १४) श्री.जगदीश मुळीक, विधानसभा सदस्य २०८,वडगांव शेरी, विधानसभा मतदार संघ | सेक्टर नं.१३ ब, त्रिंबकेश्वर सोसायटी, वडगाव शेरी, ता.हवेली, पुणे १४ | सदस्य |
| | १५) श्री. विजय काळे, विधानसभा सदस्य २०९, शिवाजीनगर, विधानसभा मतदार संघ | प्लॉट नं.४,९४०/४ शिवाजीनगर मॉडेल कॉलनी, कॅनॉल रोड, पुणे ४११ ००५. | सदस्य |
| | १६) श्री.मेधा कुलकर्णी, विधानसभा सदस्य २१०, कोथरुड, विधानसभा मतदार संघ | ५ नंदनवन डहाणूकर कॉलनी, नं ८, कोथरुड, पुणे ४११ ०३८. | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | १७) श्री.भिमराव तापकीर, विधानसभा सदस्य २११, खडकवासला, विधानसभा मतदार संघ | स.नं.३७/१, फाईव्ह स्टार सोसायटी, धनकवडी, पुणे ४३ | सदस्य |
| | १८) श्रीमती माधुरी मिसाळ, विधानसभा सदस्य २१२, पर्वती, विधानसभा मतदार संघ | स.नं.५७४, रामयणनगरी, डी-६, इमारत, बिबवेवाडी, पुणे | सदस्य |
| | १९) श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य २१३, हडपसर, विधानसभा मतदार संघ | छत्रपती शिवाजी चौक, कोंढवा गावठाण, पुणे - ४११ ०४८. | सदस्य |
| | २०) श्री.दिलीप कांबळे, विधानसभा सदस्य २१४, पुणे कॅन्टोनमेंट, विधानसभा मतदार संघ | परमार नगर हौ. सोसायटी, एच-२५१ फातीमा नगर वानवडी, पुणे ४११ ०१३. | सदस्य |
| | २१) श्री.गिरीश बापट, विधानसभा सदस्य २१५, कसबा पेठ, विधानसभा मतदार संघ | २१२, शनिवार पेठ, पुणे | सदस्य |
| **५) जिल्ह्यातील विधानपरीषद सदस्य** | | | |
| | २२)श्री.जयदेव गायकवाड, विधानपरिषद सदस्य | कुमार पिनॅकल सोसायटी, फ्लॅट नं. ४०३, ताडीवाला रोड, पुणे | सदस्य |
| | २३) श्री.अनिल भोसले, विधानपरिषद सदस्य | शिवाई बंगला, भोसलेनगर, पुणे १६ | सदस्य |
| | २४) श्रीमती दिप्ती चवधरी, विधानपरिषद सदस्य | १०२ वसंत वैभव, मॉडेल कॉलनी, लकाकी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६ | सदस्य |
| | २५) श्री.शरद रणपिसे, विधानपरिषद सदस्य | सी/२,वृंदावन पार्क रोड, बोट क्लब एरिया, पुणे | सदस्य |
| | २६) श्री. अनंत गाडगीळ,विधानपरिषद सदस्य | ४१९, शनिवार पेठ, काकासाहेब गाडगीळ पथ, पुणे ४११ ०३०. | सदस्य |
| ६) | पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण | जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, चव्हाणनगर पाषाण, पुणे ४११ ००८. | सदस्य |
| ७) | **राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी अनुसूचित जाती/जमाती** | | |
| | १. | | सदस्य |
| | २. | | सदस्य |
| | ३. | | सदस्य |
| ८) | **अशासकिय संस्थामधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे अशासकिय सदस्य** | | |
| | १. श्री. शैलेश रावजी चव्हाण, | घोरपडी गाव, रेल्वे कॉर्टर, पुणे मो. नं.९८२२०६२२२८ | सदस्य |
| | २. श्री. छगन लक्ष्मण बुलाखे, | ५४/डी/पी-९३, लोहियानगर, गंज पेठ, पुणे ४११ ०४२. मो.नं.९३७०५७१४५९ | सदस्य |
| | ३. श्री. राजाभाऊ दत्तात्रय शेंडगे, | २२९/१ मनिषा सोसायटी, लक्ष्मीनगर, पर्वती, पुणे ४११ ००९. मो.नं.९८२२४२७६१७ | सदस्य |
| | ४. श्री. बाळासाहेब प्रभाकर खुणे, | मु. पो. खेड शिवापूर, ता. हवेली, जिं. पुणे, मो.नं.९०११८६३१८६ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | ५. श्री. संजय भिमराव कांबळे, | गौतम बौद्ध सोसा., कोंढवा खु. पुणे | सदस्य |
| ९) | **अशासकिय संस्थामधील ३ बिगर मागासवर्गीय सदस्य** | | |
| | १. श्री. कैलास मारुती भोसले, | आदिनाथ नगर, शिरुर, ता. शिरुर जि. पुणे ४१४ २१० मो. नं.९८९०५४४४४० | सदस्य |
| | २.श्रीमती मनिषा एकनाथ धारणे, | १२९० शुक्रवार पेठ, सुभाषनगर पुणे ४११ ००२. मो. नं.९६०४८४८९५९ | सदस्य |
| | ३. श्री. योगेश ऊर्फ देवदत्त भिकू बाचल, | एम २९/६७८, एम आय जी कॉलनी, निलज्योती सोसा. गोखलेनगर, पुणे ४११ ०१६. मो. नं.९४२२०३४०७५ | सदस्य |
| १०) | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे | जिल्हा समाजकल्याण कार्यालय, पीएमटी बिल्डींग, स्वारगेट, पुणे ४११ ०४२. | सदस्य सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :- १) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे तथा, सदस्य सचिव, जिल्हा समाजकल्याण कार्यालय, पीएमटी बिल्डींग, स्वारगेट, पुणे ४११ ०४२.

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठित करण्यात आलेली असल्याने सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रती संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी

२) मा. सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे माहितीस्तव सादर.

३) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती अ

४) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे करिता

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: जिदनिस-१०९५/प्र. क्र. १२३/मावक-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: ७ डिसेंबर, १९९५.

वाचा:- [१] सह सचिव, भारत सरकार, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे [इंग्रजी] क्रमांक ११०१२/३/८९/पीसीआर-डेस्क, दिनांक १७ एप्रिल, १९९५ चे अर्ध शासकीय पत्र.

[२] संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक: सक/मावक/जिदस/पुनर्रचना/९५-९६/का-११/२१७, दिनांक ८ सप्टेंबर, १९९५ चे पत्र.

शासन निर्णय:- भारत सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], अधिनियम, १९८९ भारतभर सर्वत्र लागू केला असून पोट कलम [१], कलम २३, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], अधिनियम, १९८९ अन्वये असलेल्या अधिकारात केंद्र शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], नियम, १९९५ भाग-२ चे नियम तयार केले आहेत. सदरहू नियम भारत सरकारचे कल्याण मंत्रालयाने, भारत सरकार राजपत्र-असाधारण, भाग-२, अंक-३ नवी दिल्ली दिनांक ३१-३-१९९५ अन्वये प्रसिध्द केले आहेत. सदरहू राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], नियम, १९९५, भाग-२ चे नियमाचे अनुषंगाने सहसचिव, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संदर्भाधीन क्रमांक १ च्या दिनांक १७ एप्रिल, १९९५ च्या अर्ध शासकीय पत्रात दिलेल्या मार्गदर्शक सूचनेस अनुसरून या नियमांचे प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित [जिल्हाधिकारी] जिल्हादंडाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्याचे ठिकाणी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना करण्यात येत आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील

| | | |
|---|---|---|
| [१] | [जिल्हाधिकारी व] जिल्हा दंडाधिकारी | अध्यक्ष |
| [२] | संसद सदस्य, विधानसभा व विधान परिषदेवर निवडून आलेले सदस्य | सदस्य |
| [३] | जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| [४] | अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे राज्य शासनाचे ३, राजपत्रित अधिकारी | सदस्य |
| [५] | अशासकीय संस्थामधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे अशासकीय सदस्य [ ५ सदस्यांपेक्षा अधिक नसावेत] | सदस्य |
| [६] | अशासकीय संस्थामधील ३ बिगर मागासवर्गीय सदस्य [ ३ पेक्षा अधिक नसावेत] | सदस्य |
| [७] | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य सचिव. |

२. समितीच्या सर्व सदस्यांची नियुक्ती संबंधित जिल्हादंडाधिकारी हे करतील. या समितीमध्ये अनुक्रमांक १, ३, ४ व ७ वरील सदस्य हे समितीमधील पदसिध्द शासकीय सदस्य

..२..

राहतील. अ.क्र.२, ५, व ६ वरील सदस्य नियुक्ती, संबंधित जिल्हादंडाधिकारी, समितीचे अध्यक्ष यांनी संबंधित जिल्हयाचे पालक मंत्र्यांकडून मान्य करून घ्यावी. संबंधित [जिल्हाधिकाऱ्यांनी] जिल्हादंडाधिकाऱ्यांनी, समितीचे अध्यक्षांनी समितीचे स्थापनेची/सदस्य नियुक्ती बाबत आदेशांच्या प्रती शासनाच्या गृहविभाग, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग तसेच संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे माहितीसाठी पाठवावी.

३. जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची कार्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

४. या समितीच्या एका कॅलेंडर वर्षात निदान दर तीन महिन्यांनी एक याप्रमाणे एकूण ४ बैठका घेण्यात याव्यात.

५. अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२[अे]यातील सेक्शन १ मधील१[१][बी]च्या तरतूदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग, क्र.टीआरए-१४७७/१०३२/सी/एसईआर-५, दिनांक २३.९.१९७७ व क्र.टीआरए १०८३/१४२६/एसईआर-५, दिनांक १.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. या नियमांच्या तरतूदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

"समितीवर अशासकीय सदस्य म्हणून असणाऱ्या आमदार/खासदार यांचा प्रवासभत्ता/दैनिकभत्ता, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक टीआरओ-१४७०/१३१/अठरा, दिनांक २७.१.१९७१ प्रमाणे आमदार/खासदार यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जावा". संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना

अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या देयकांवर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यांत येत आहे.

६. वर परिच्छेद १ व २ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना होईपर्यन्त शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एससीडब्ल्यू १०८८/२०५६-४/मावक-२, दिनांक २० मार्च, १९९३ नुसार सध्या अस्तित्वात असलेल्या अस्पृश्यता निर्मूलनार्थ जिल्हा दक्षता समितीच्या बैठका घेण्यांत याव्यात व जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या स्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक २० मार्च, १९९३ अन्वये अस्तित्वात असलेली जिल्हा दक्षता समिती रद्द करण्यांत यावी [शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एससीडब्ल्यू १०८८/२०५६-८/मावक-२, दिनांक २० मार्च, १९९३ रद्द समजण्यांत यावा].

यावर होणारा खर्च हा "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण-सी-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-एल-अनुसूचित जातींचे कल्याण-एल-चार-इतर योजना [५][अे]अस्पृश्यता निवारण प्रचारासाठी अनुदान मागणी क्र. एन-८ या अर्थसंकल्पिय शीर्षाखाली टाकण्यांत यावा, व त्याखालील प्रतिवर्षी केलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यांत यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्रकरण क्रमांक ८३०/९५/व्यय-११, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(र.प्र. गायकवाड)
[ र. प्र. गायकवाड ]
सचिव, समाज कल्याण

प्रति:
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे सचिव

..४.

प्रपत्र "अ"

शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्रमांक-जिदनिस १०९५/ प्र.क्र. १२३/मावक-२, दिनांक ७ डिसेंबर, १९९५ चे प्रपत्र

---

**जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची कार्ये :**

[१] अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व त्याखालील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) नियम, १९९५ भाग-२ ची अंमलबजावणी जिल्ह्यात योग्य रितीने व काटेकोरपणे होते किंवा कसे याचा आढावा घेणे तसेच या संदर्भातील प्रकरणांचा आढावा घेणे.

[२] अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व त्याखालील नियमांतर्गत अत्याचारग्रस्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे व्यक्तींना देण्यात येणारे आर्थिक सहाय्य/मदत नियमानुसार देण्यात येते किंवा कसे, याबाबतच्या प्रकरणांचा आढावा घेणे.

[३] अत्याचारग्रस्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे व्यक्तीचे पुनर्वसन इ. नियमानुसार व तात्काळ करण्यात येते आहे किंवा कसे, या संदर्भातील प्रकरणांचा आढावा घेणे.

[४] अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) नियम, १९८९ अंतर्गत पोलीसात दाखल करण्यात आलेले गुन्हे/न्यायालयात दाखल करण्यात आलेली प्रकरणे यांचा आढावा घेणे.

[५] या अधिनियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी संबंधित संस्था/अधिकारी/कार्यालयाकडून होते आहे किंवा कसे, याचा आढावा घेणे.

[६] या अधिनियमांतर्गत नियमांचे उल्लंघन अथवा अंमलबजावणीसंबंधी शासनास प्राप्त होणाऱ्या विविध अहवालांचा/प्रकरणांचा आढावा घेणे.

---

उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मंत्री, समाज कल्याण यांचे खाजगी सचिव
राज्यमंत्री, समाज कल्याण यांचे स्वीय सहाय्यक
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ, यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक/सहसंचालक, भारत सरकार (पीसीआर सेल) कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
पोलीस महानिरीक्षक, मुंबई
सर्व जिल्हा दंडाधिकारी
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व जिल्ह्यांचे पोलीस अधिक्षक
सर्व सभापती, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व कार्यासने, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
निवड नस्ती मावक-२.

मारांका.